मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
५३९१

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय वा. वी.
दा. क्र. ५३९१

IRBK-0105391
IRBK-0105391

# मनुका

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का. वा.
दा. क्र. ५३९१



विजय-प्रकाशन

... संग्रहालय, ठाणे.
खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत क...
तसे न के... ...चा नियम क्र. ५ (८) नुस...
...वी ला...

[ जोडाक्षर विरहित ]

: लेखक :

तु. ता. सावंत, एम्. ए.

IRBK-0105391
IRBK-0105391

किंमत ४ आणे

विजय प्रकाशन–मुंबई १२

प्रकाशक
सा. ना. सारंग.
बी. आय्. टी. चाळ नं. ४
परळ, मुंबई १२

आवृत्ति पहिली सन १९४६
आवृत्ति दुसरी सन १९४९
आवृत्ति तिसरी सन १९५५

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

★

: मुद्रक :
मधुकर रघुनाथ कालेवार
प्रफुल्ल प्रिंटिंग प्रेस,
३८० ई, गिरगांव रोड,
मुंबई नं. २

# उंदीरमामा राजे झाले !



एक होता गांव.
एकदां तेथें उंदीर फार झाले
एक मोठा उंदीर होता.
उंदरांचा तो मामा होता.
'एक दिवस उंदीरमामानें दवंडी पिटली.
ऐका हो ऐका ! सगळे उंदीर ऐका !
मी उंदीर मामा सांगतों तें ऐका !

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

नदीकांठीं वडाचें एक झाड आहे.
तेथें एक पडकें घर आहे.
तेथें सगळे उंदीर या.
न चुकतां या ! न विसरतां या !
सगळे उंदीर या ! या हो या !
सभेची वेळ झाली.
मोठे उंदीर आले.
छोटे उंदीर आले.
सगळे उंदीर आले.
उंदीरमामा एका दगडावर उभे राहिले.
उंदीरमामा बोलूं लागले—
'गांवांत उंदीर फार झाले आहेत.
आतां हा गांव आपला झाला.
आपण लोकांना हांकून लावूंया.
आपण गांवचे राजे होऊंया'
हें भाषण ऐकून सगळे उंदीर खूष झाले.
ते आनंदानें डोलूं लागले.
ते जोरजोरानें गाणें गाऊं लागले.
ते नाचूं बागडूं लागले.

ही बातमी गांवांतील मांजरांना कळली.
सगळीं मांजरें जमा झालीं.
मांजरें नदीकडे धांवत सुटलीं.
मांजरांना बघून उंदीर घाबरले.
उंदीर वाटेल तिकडे धांवत सुटले.
कांहीं उंदीर नदींत बुडून मेले.
कांहीं उंदीर बिळांत शिरले.
कांहीं उंदीर मांजरांना सांपडले.
मांजरांची मजा झाली.


४३०९

## उतावळा ससा

सिंह पशूंचा राजा.
एक मोठें जंगल होतें.
जंगलांत एक मोठी गुहा होती.
गुहेंत सिंह राहात असे.
एकदां सिंहानें विचार केला—
आपण पशूंचे राजे. पशूंना जेवायला बोलावूं.

सिंह जोरानें पशूंना बोलावूं लागला.
वाघ धांवत आला. लांडगा धांवत आला.
हरण धांवत आला. सगळे पशू धांवत आले.
मग सिंह बोलला--'मी तुमचा राजा.
मी आज सर्व पशूंना जेवायला वाढणार.
मांस जमा करा. फळें जमा करा.
सगळे कामाला लागले.
कोणी मांस जमा केलें. कोणीं फळें आणलीं.
अशी सगळी तयारी झाली.
लांडगा पानें मांडूं लागला.
वाघ देखरेख करूं लागला.
पानांवर मांस वाढून झालें.
मांसाचा घमघमीत वास सुटला.
तेथें एक होता ससा. ससा होता उतावळा.
अजून कोणी पानावर बसलें नाहीं.
ससा उठला. एका पानावर बसला.
हें वाघानें पाहिलें.
वाघाला आला राग. तो सशाजवळ आला.

वाघ बोलला—
'उतावळा ससा' येथें बसला कसा ?
हें तुझें पान नाहीं. तूं काय मांस खातोस



वाघानें सशाचे कान पकडले.
जोरानें ओढले.
सशाचे कान लांब झाले.
सगळे पशू सशाला हसले.
ते बोलले—
'उतावळा ससा, येथें बसला कसा ?
वाघ दिवाण. सशाचे पकडी कान.
छान झालें. सशाचे कान लांब झाले.'

# गाढवांचा गोंधळ

एक होता गांव.

त्या गांवांत होता एक कुंभार.

कुंभाराजवळ होता एक गाढव.

तो गाढव आपणांला फार शहाणा समजे.

एकदां काय झालें.

गाढव चरत होता.

एकदम जोराचा वारा सुटला.

आकाशांत काळे काळे ढग जमले.

वीज चम्चम् चमकूं लागली.

' गुडुम गुडुम ' आवाज झाले.

जिकडे तिकडे काळोख पसरला.

गाढव घाबरला.

तो पळूं लागला.


जोराचा पाऊस सुरू झाला.

गाढव ओरडूं लागला.

' पळा पळा, आकाशाला भोंक पडलें. ! '

दुसरा गाढव पळूं लागला.

तिसरा गाढव पळूं लागला.
चौथा गाढव पळूं लागला.
सगळेच गाढव पळूं लागले.
वाटेंत गाढवांना भेटला एक घोडा.
घोडा बोलला—
' गाढवांनो पळतां कशाला ? '




तो शहाणा गाढव बोलला—
' आकाशाला भोंक पडलें आहे.
भोंकांतून पाणी गळत आहे.

मग पळूं नको तर काय करूं ? '
घोडा हंसला व बोलला—
' अरे गाढवा आकाशाला भोंक नाहीं पडलें.
हा पाऊस पडत आहे.'
इतर गाढवहि हसले.
तो शहाणा गाढव लाजला.

## बैल बनला बुवा

एक होता बैल.
तो नेहमीं रानांत जायचा.
रानांत जाऊन चारा खायचा.
एकदां बैलाला आला कंटाळा.
बैल मनांत बोलला—
' आज मला आला आहे कंटाळा.
मी नाहीं रानांत जाणार.
मी आतां बुवा बनणार.
मग इतर बैल मजकडे येतील.

ते मला बुवा बोलतील.
ते मला मान देतील.



ते मला चारा देतील.
मग बैल बुवा बनला.
तो जमिनीवर बसला.
बैलानें डोळे मिटले.
तेथें दुसरे बैल आले.
ते बुवा बैलाला हसले.
हसले आणि निघून गेले.
एक दिवस गेला.
दुसरा दिवस गेला.

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम 288788
विभाग बा. वा.
क्रमांक 2088
नों. दि. 3-–-91

तिसरा दिवस गेला.

दुसरे बैल येत आणि जात.

पण बुवा बैलाला कुणी चारा देईना.

उलट दुसरे बैल बुवा बैलाला हसत.

ते बुवा बैलाला बोलत—

'बैल बनला बुवा. खाऊं लागला हवा!'

बिचारा बुवा बैल!

तो मनांत बोलला--

'बैल माणसांपेक्षां शहाणे आहेत.


ते मला चारा देत नाहींत.'

ते मला पाणी देत नाहींत.'

बुवा बैल उठला.

आणि रानांत चरायला गेला.

# घोडा घसरला, बसायला विसरला !



फार दिवस झाले.

सिंह रानांत राही. वाघ रानांत राही.

बैल रानांत राही. गाय रानांत राही.

घोडा रानांत राही. सगळे पशू रानांत राहत.

एकदां घोडा व वाघ यांचें भांडण झालें.

वाघ बोलला— 'मी तुला खाईन'

घोडा बोलला—

'मी धांवून जाईन. मी तुला सांपडणार नाहीं

वाघ लपून राही.

घोडा जवळ दिसला कीं पकडायला जाई.

पण घोडा पळून जाई.

असे खूप दिवस झाले.

एक दिवस घोडा फार दमला.

तो जमिनीवर बसला. तिथेंच झोंपला.

तें वाघानें पाहिलें.

वाघाला आनंद झाला.

वाघाला वाटलें आतां पोटभर मांस खायला मिळेल.

वाघ जोरानें ओरडला.

आतां तो उडी टाकणार तोंच—

घोडा जागा झाला.

तो अगदीं घाबरून गेला.

कसा तरी धडपडत उठला आणि धांवू लागला.

वाघ मागून धांवतच होता.

आतां आपणाला वाघ खाणार असें वाटून घोडा खूप घाबरला.

तो जोरानें पळूं लागला.


धांवता धांवता डोंगरावरून पाय घसरला.

घोडा खूप खालीं घसरत गेला.
तो वाघाला सांपडला नाहीं.
घोडा बोलला—
घसरलों तर घसरलों. पण वाघाला नाहीं सांपडलों !
मग घोडा कधींच जमिनीवर बसला नाहीं.
अजून घोडा कधीं बसत नाहीं.

## बैरागी बोकड

एक होता बोकड.
बोकडाला पांढरी दाढी होती.
तो बोकड एकदां आजारी पडला.
बोकडाला फिरतां येईना.
बोकडाला चारा मिळेना, पाणी मिळेना.
तिथें आला दुसरा बोकड.
आजारी बोकड बोलला—
'अरे बोकडा, मी बैरागी आहे.
मला चारा आणून दे. पाणी आणून दे.

मी तुझें बरें करीन.'
बोकड चारा आणूं लागला.
दुसरा बोकड चारा आणूं लागला.
खूप बोकड चारा आणूं लागले.
मग बैरागी बोकड बोलला—
'मी आतां देव झालों.
मला चारा नको. मला पाणी नको.
मला आतां कांहीं नको.'
पण सगळे बोकड चारा आणीत.
बैरागी बोकड चारा खात नसे. पाणी पीत नसे.
इतर बोकड बोलूं लागले—
'हा बैरागी चारा खात नाहीं. पाणी पीत नाहीं.
मग जगतो कसा ?'
रात झाली.
इतर बोकड लपून बसले.
मग बैरागी बोकड उभा राहिला.
तो हावरेपणानें चारा खाऊं लागला.
तो घटाघटा पाणी पिऊं लागला.



इतर बोकड ओरडले—

‘अरे लबाडा !

दिवसा उपाशी राहतोस.

रात्रींचा चारा खातोस.

घटाघटा पाणी पितोस.


इतरांना फसवतोस.

ते सगळे बोकड धांवले.

बैरागी बोकड घाबरला. तो पळत सुटला.


पण इतर बोकडांनीं बैरागी बोकडास खूप मारलें.

मी तुझें बरें करीन.'
बोकड चारा आणूं लागला.
दुसरा बोकड चारा आणूं लागला.
खूप बोकड चारा आणूं लागले.
मग बैरागी बोकड बोलला—
'मी आतां देव झालों.
मला चारा नको. मला पाणी नको.
मला आतां कांहीं नको.'
पण सगळे बोकड चारा आणीत.
बैरागी बोकड चारा खात नसे. पाणी पीत नसे.
इतर बोकड बोलूं लागले—
'हा बैरागी चारा खात नाहीं. पाणी पीत नाहीं.
मग जगतो कसा ?'
रात झाली.
इतर बोकड लपून बसले.
मग बैरागी बोकड उभा राहिला.
तो हावरेपणानें चारा खाऊं लागला.
तो घटाघटा पाणी पिऊं लागला.



इतर बोकड ओरडले—
‘अरे लबाडा !
दिवसा उपाशी राहतोस.
रातींचा चारा खातोस.
घटाघटा पाणी पितोस.
इतरांना फसवतोस.
ते सगळे बोकड धांवले.
बैरागी बोकड घाबरला. तो पळत सुटला.
पण इतर बोकडांनीं बैरागी बोकडास खूप मारलें.

मी तुझें बरें करीन.'
बोकड चारा आणूं लागला.
दुसरा बोकड चारा आणूं लागला.
खूप बोकड चारा आणूं लागले.
मग बैरागी बोकड बोलला—
'मी आतां देव झालों.
मला चारा नको. मला पाणी नको.
मला आतां कांहीं नको.'
पण सगळे बोकड चारा आणीत.
बैरागी बोकड चारा खात नसे. पाणी पीत नसे.
इतर बोकड बोलूं लागले—
'हा बैरागी चारा खात नाहीं. पाणी पीत नाहीं.
मग जगतो कसा ?'
रात झाली.
इतर बोकड लपून बसले.
मग बैरागी बोकड उभा राहिला.
तो हावरेपणानें चारा खाऊं लागला.
तो घटाघटा पाणी पिऊं लागला.



इतर बोकड ओरडले—
‘अरे लबाडा !
दिवसा उपाशी राहतोस.
रातींचा चारा खातोस.
घटाघटा पाणी पितोस.
इतरांना फसवतोस.
ते सगळे बोकड धांवले.
बैरागी बोकड घाबरला. तो पळत सुटला.
पण इतर बोकडांनीं बैरागी बोकडास खूप मारलें.

# वाघोबाचें लगीन

एका रानांत एक वाघ होता.
एकदां वाघाला वाटलें--
आपण आतां लगीन करूं.
मग--
वाघानें लांडगोबाला बोलाविलें.
हरणाला बोलाविलें. वानराला बोलाविलें.
वाघानें सगळे पशू बोलाविले.
लांडगा आला. हरण आला. वानर आला.
सगळे पशू आले.
वाघ पशूंना बोलला--
' मला लगीन करायचें आहे.
एक नवरी शोधून आणा. '
मग लांडगा नवरी शोधायला निघाला.
हरण नवरी शोधायला निघाला.
वानर नवरी शोधायला निघाला.
सगळे नवरी शोधायला निघाले.
ते रानांत फिरले. माळावर फिरले.

पण कुठें नवरी सांपडेना. सगळे दमले.
नदीकांठावर फिरले. ते सगळीकडे फिरले.
लांडगा गाढवाला बोलला--
आपण वाघोबाची फजिती करूं.'




गाढव नवरी बनला.
लांडगा वाघाला बोलला—
वाघोबा, वाघोबा, ही पहा नवरी.
वाघोबा राजे-राणी ही नवरी.
वाघाला आनंद झाला.

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक 2096
नों. दि.

वाघोबाची वरात निघाली.

वाघ पुढें व गाढव नवरी मागें.

मागून सगळे पशू चालूं लागले.

कुणी ढोल वाजविले. कुणी तासे वाजविले.

कुणी गाऊं लागले. कुणी नाचूं लागले.

वाघानें नवरीचा बुरखा हळूच बाजूला केला.

गाढवाला बघून वाघाला आला राग.

वाघ फार रागावला.

वाघानें जोरानें डरकाळी फोडली.

सगळे पशू पळत सुटले.

वाघ लांडगोबाला शोधूं लागला.

पण लांडगोबा अगोदरच पळून गेला होता.

IRBK-0105391

IRBK-0105391